**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या**

**दिनांक : २५/०६/२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजता**

**आयोजित केलेल्या २६२ व्या बैठकीचे कार्यवृत्त**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची २६२ वी बैठक गुरुवार, दिनांक २५/०६/२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजता मा.प्रधान सचिव / गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दालन, ३ रा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली.

**सदरहू बैठकीस खालील प्रमाणे उपस्थिती होती :**

| | | |
|---|---|---|
| **१.** | **श्री.एस.एस.झेंडे**<br>**उपाध्यक्ष / प्राधिकरण** | **: पदसिध्द अध्यक्ष/प्राधिकरण** |
| **२.** | **श्री.श्रीकांत सिंह,**<br>**प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग** | **: सदस्य/प्राधिकरण** |
| **३.** | **श्री. नितीन करीर**<br>**प्रधान सचिव, नगरविकास विभाग** | **: सदस्य/प्राधिकरण** |

सचिव / प्रा. यांनी सन्माननीय सदस्य आणि सर्व उपस्थितांचे स्वागत केले. तद्‌नंतर मा.उपाध्यक्ष तथा पदसिध्द अध्यक्ष / प्रा. यांच्या परवानगीने विषय सुचीवरील विषय चर्चेस घेण्यात आले.

**बाब क्रमांक : २६२/१**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १२/०६/२०१५ रोजी झालेल्या २६१ व्या बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त स्थायी करण्याबाबत.**

----------------------

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

२६१ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करताना मा.प्रधान सचिव/गृहनिर्माण विभाग, सदस्य/प्रा. यांनी सांगितले कीं, कार्यवृत्तांतातील पृष्ठ क्रमांक १२ वरील बाब क्रमांक २६१/८ मधील दुस-या परिच्छेदातील पहिल्या ओळीतील ‘ सहसचिव व अवर सचिव, गृहनिर्माण विभाग यांनी सांगितले ’ हा मजकूर वगळण्यात यावा. तसेच दुस-या परिच्छेदातील पाचव्या ओळीतील ‘ मुख्य अधिकारी या पदासाठी अपर जिल्हाधिकारी व समकक्ष अशी दुरुस्ती करण्यात यावी. ’ ऐवजी ‘ मुख्य अधिकारी हे पद अपर जिल्हाधिकारी संवर्गातून अथवा त्या पदाशी समकक्ष असणारे म्हाडातील उपमुख्य अभियंता या संवर्गातून भरण्यात यावे. ’ अशी दुरुस्ती करावी.

२६१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करताना मा.प्रधान सचिव/नगर विकास विभाग, सदस्य / प्रा. यांनी सांगितले होते कीं, बाब क्रमांक २६०/४ चा ठराव क्र.६६८८ मंजूरीसाठी आला त्यावेळी ते उपस्थित नसल्याने त्याबाबत त्यांचेशी चर्चा करणे आवश्यक होते. त्यानुसार मा.उपाध्यक्ष / प्रा. व विधी सल्लागार / प्रा. यांनी प्राधिकरण ठराव क्र.६२६०, दिनांक ४/०६/२००७ शासनाने मंजूर केला असून ठराव क्र.६३४९ दिनांक २५/११/२००८ या ठरावास शासनाची मंजूरी प्राप्त झालेली नाही, ही बाब निदर्शनास आणून दिली. सदर चर्चेच्या अनुषंगाने मा.प्रधान सचिव / नगर विकास, सदस्य / प्रा. यांचेशी समक्ष चर्चा केली. बाब क्र.२६०/४ चा ठराव क्र.६६८८ स्थायी करण्यास मान्यता देण्यात आली.

सन्माननीय सदस्यानी बैठकीच्या प्रारुप कार्यवृत्तांतात सुचविलेल्या दुरुस्तीसह आणि दिलेल्या सुचनांसह सदर कार्यवृत्त एकमताने स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक : २६२/३**

**विषय :- म्हाडा अभिन्यास ओशिवारा येथील न.भू.क्र.२-अ(पै), २-ब(पै), ३(पै), ६(पै), अंतर्गत म्हाडाच्या ताब्यातील २५००.४३ चौ.मी.+रस्त्याचे ५०१.४३ चौ.मी. असे एकूण ३००१.८६ चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावर म्हाड विनिमय १३(२) अंतर्गत मा.न्यायमुर्ती यांच्या सुरभी सहकारी गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६६९८** **दिनांक : २५/०६/२०१५**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या म्हाडा अभिन्यास ओशिवरा येथील न.भू.क्र.२-अ(पै), २-ब(पै), ३(पै), ६(पै), अंतर्गत म्हाडाच्या ताब्यातील २५००.४३ चौ.मी.+रस्त्याचे ५०१.४३ चौ.मी. असे एकूण ३००१.८६ चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावर अंदाजे १०७६ चौ.फुट ( ९९.९६ चौ.मि.) चटई क्षेत्रफळाच्या सदनिकांची म्हाड ( मिळकत व्यवस्थापन, विक्री हस्तांतरण व गाळयांचे अदला बदल ) विनियम १३ (२) अंतर्गत शासन निर्णय क्र.वाटप-११०५/प्र.क्र.१८०/भाग-१/गृनिभू, दिनांक २५/०४/२०११ मधील तरतूदीच्या अधिन राहून मा.उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती यांचेसाठी गृहनिर्माण योजना राबविण्याकरिता प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी प्रस्ताव पाठविण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.

वरीलप्रमाणे चर्चा झाल्यानंतर बैठकीचे पदसिध्द अध्यक्ष तथा उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांच्या संमतीने बाब क्रमांक २६१/११ मधील म्हाडा जमिनीवरील एसआरए योजनेचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास परत करणेच्या विषयावर चर्चा करण्यात आली. मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा. यांनी याबाबत सांगितले कीं, परिशिष्ट-२ प्रमाणित करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात १३ उप जिल्हाधिकारी यांची स्वतंत्ररित्या नेमणूक करण्याचे शासन स्तरावर प्रस्तावित आहे. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या दिनांक १/१२/२०१४ रोजीच्या बैठकीत झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने म्हाडाचे जमिनीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पाठविणे आवश्यक आहे. एसआरए स्कीमबाबत अवधेश प्रसाद तिवारी विरुध्द महाराष्ट्र शासन या न्यायालयीन निर्णयाचा साकल्याने अभ्यास करुन कायदेशिर बाबींबाबतची टिपणी सादर करण्याच्या सूचना विधी सल्लागार/प्रा. यांना देण्यात आल्या होत्या. मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग सदस्य/प्रा. यांनी सांगितले कीं, विधी सल्लागार/प्रा. यांनी याबाबत दिलेले अभिप्राय रेकॉर्डवर घेण्यात यावेत. विधी सल्लागार / प्रा. यांनी याबाबत दिलेले मत रेकॉर्डवर ठेवून पुढीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव क्रमांक : ६६९९** **दिनांक : २५/०६/२०१५**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या दिनांक ०१/१२/२०१४ रोजीच्या बैठकीत झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून प्राप्त झालेले म्हाडा जमिनीवरील झोपडपट्टी पुर्नविकास योजनेचे प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास परत करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यात यावी.